CMYK

**आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ठाणेदारावर शिस्तभंगाची कारवाई करा**
>> पान 2

**क्षयरोग प्रसार रोखण्यासाठी बी-पाल्म उपचारांसह विशेष मोहीम**
>> पान 3

**जिल्ह्यातील अतिवृष्टीची मदत तात्काळ देण्यासाठी माजी कृषिमंत्री शरद पवारांना साकडे**
>> पान 4

**सुविचार**
जीवनात संयमाची आवश्यकता आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 290 ■ बुधवार, दि. 02 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





**'मना'चे श्लोक चित्रपटातील पोस्टर प्रदर्शित, रुपेरी पडद्यावर हृदयस्पर्शी कथा येईल लवकरच समोर**

आतील पान

# राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा

## सीसीएमपीचा कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची होणार वैद्यक परिषदेच्या पुस्तकात नोंदणी; एमएमसीचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य वैद्यक परिषदेने मोठा निर्णय घेत राज्यातील ज्या होमिओपॅथी डॉक्टरांनी मॉडर्न फार्माकोलॉजीचा अर्थात सीसीएमपीचा कोर्स पूर्ण केला आहे, अशा होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र राज्य वैद्यक परिषदेच्या नोंदणी पुस्तकात होणार आहे. यामुळे राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी होमिओपॅथी डॉक्टरांना ऍलोपॅथी औषधांची प्रॅक्टिस करण्याची परवानगी नव्हती. मात्र राज्य सरकारने या डॉक्टरांना आधुनिक फार्म्याकॉलॉजीचा एक वर्षाचा कोर्स पूर्ण केल्यानंतर ऍलोपॅथी औषधांची प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली आहे.**




दरम्यान, या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशनने विरोध केला होता. मात्र काल (३० जून) महाराष्ट्र वैद्यक परिषदेने परिपत्रक काढत राज्यातील सीसीएमपी कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र वैद्यक परिषदेत होणार आहे. यामुळे राज्यातील लाखो होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळाला आहे. मात्र या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशन विरोध करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बाल वयात मेंदूची न्यूरो प्लास्टिसिटी सर्वाधिक असते, बाल वयात मेंदू लवचिक आणि विकसनशील अवस्थेत असल्यामुळे नवीन गोष्टी, नवीन भाषा शिकणे सोपे ठरते असे मत बाल मानसोपचार तज्ञांनी व्यक्त केले आहे. मात्र, जसे जसे वय वाढत जाते मेंदूतील मज्जातंतू विकसित होण्याची गती कमी होते, त्यामुळे अल्प वयात नवीन गोष्टी, नवीन भाषा आत्मसात करणं वाढलेल्या वयापेक्षा जास्त सोपं ठरतं असं मत नागपूरचे प्रख्यात बाल मानसोपचार तज्ञ डॉ निखिल पांडे यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, प्राथमिक शिक्षणात सर्वाधिक भर मातृभाषेवरच असायला हवं कारण क्लिष्ट >> पान २

### महाराष्ट्रात स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने दिलेल्या माहितीनुसार राज्यात स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. विधानसभेत वीज मीटर संदर्भात एक तारांकीत प्रश्न आला होता. या प्रश्नाला उत्तर देताना राज्यात विजेचे स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. या मीटरच्या मदतीने बिलिंग केले जाते; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आतापर्यंत २८ हजार २०२ वाहिन्यांवर स्मार्ट माटर बसविले आहेत. राज्यात आतापर्यंत ४ लाख ७ हजार ५०७ पैकी १ लाख ४० हजार ५६१ रोहित्रांना (ट्रान्सफॉर्मर) स्मार्ट मीटर बसविले आहेत. राज्यातील २ कोटी २४ लाख ८८ हजार ग्राहकांपैकी ३२ लाख २३ हजार ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेतली आहेत. ही सर्व स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत; अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

स्मार्ट पोस्टपेड मीटर रिअल-टाइम डेटा पुरवतात. यामुळे नेमकी किती वीज वापरली याची अचूक आकडेवारी कंपनीला आणि ग्राहकाला मिळते. या आकडेवारीआधारे योग्य ते बिल ग्राहकाला आकारले जाते. चेक, थेट खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर अथवा युनिफाईड पेमेंट सर्व्हिस अर्थात यूपीआयच्या मदतीने ग्राहक बिलाचा भरणा कंपनीला करू शकतात.

### कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटनेबाबत दोषींवर कारवाई करणार - सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटनेबाबत चौकशीसाठी नियुक्त समितीचा अहवाल पंधरा दिवसात प्राप्त होणार आहे. अहवालानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

विधान परिषद सभागृहात इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटनेबाबत सदस्य सुनिल शिंदे यांनी लक्षवेधी मांडली होती. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.परिणय फुके, सदाशिव खोत आदींनी यावेळी चर्चेत भाग घेतला.

मंत्री श्री. भोसले म्हणाले, पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तीस-पस्तीस वर्षांपूर्वी सदर लोखंडी पूल उभारण्यात आला होता.लोखंडी पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असल्याची घटना १५ जून, २०२५ रोजी घडली. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य समिती नियुक्त केली आहे.

# शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर सरकार आणि विरोधकांमध्ये खडाजंगी

## कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधानसभेत मंगळवारी, १ जुलै रोजी पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आज विरोधक आक्रमक झाले. ज्यामुळे सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काँग्रेस आमदार नाना पटोले यांना दिवसभरासाठी विधानसभेतून निलंबित केले. भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबद्दल केलेल्या वक्तव्यावरून विधानसभेत आज गोंधळ उडाला. लोणीकर यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा आरोप करत विरोधी पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माफी मागण्याची मागणी केली.**



नाना पटोले आक्रमक झाले आणि त्यांनी ओरडून सांगितले की, ''शेतकऱ्यांचे वडील पंतप्रधान मोदी नसतील; ते तुमचे वडील असतील.'' त्यानंतर त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोरील राजदंडाला स्पर्श केला आणि घोषणाबाजी सुरूच ठेवली. त्याच क्षणी, सभापतींनी विधानसभा तहकूब केली.

शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी विरोधकांचे विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन

विधानभवनातील विधिमंडळाच्या पायऱ्यांवर शेतकऱ्यांवर अन्यायकारक ठरणारा शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी आज विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले.

तत्पूर्वी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मुंबई येथील विधान भवन परिसरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

### २ जुलैपासून राज्यभरात स्कूल बस बंद, आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यभरातील शाळा सुरू झाल्या आहेत. पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येतेय. राज्यभरातील शालेय बस, मालवाहतूक संघटनांनी ई-चलन प्रणालीमार्फत होणाऱ्या अन्यायकारक दंडासह विविध मागण्यांसाठी सर्व संघटनांनी एकत्र येत संप पुकारण्याची घोषणा केली आहे. १ जुलैच्या रात्रीपासून सर्व मालवाहतूकदार तर बुधवार २ जुलैपासून शालेय बस वाहतूक संघटनांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. याचा परिणाम स्कुलबसवर होण्याची शक्यता आहे.

राज्यातील अवजड आणि प्रवासी वाहतूकदारांच्या कृती समितीने २५ जून रोजी आझाद मैदानात आंदोलन



केले होते. वाहतूक पोलिस आणि परिवहन विभागाकडून चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या कारवाईविरोधात आणि अवजड वाहनांवर क्लिनर ठेवण्याच्या सक्तीविरोधात हे आंदोलन केले होते. तसंच, ई चलनाच्या माध्यमातन होणाऱ्या कारवाईमध्ये सुसूत्रता नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला होता. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मध्यस्थीनंतर हे आंदोलन थांबवण्यात आले होते. मात्र मागण्या मान्य न झाल्याने कृती समितीने १ जुलैपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.
>> पान २

## विरोधकांच्या डोक्यात 'कबर आणि कामरा'; अधिवेशन संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा टोला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ''विरोधकांच्या डोक्यात फक्त 'कबर आणि कामरा' आहे, पण आमच्यासाठी महाराष्ट्रातील १३ कोटी जनता महत्त्वाची आहे,'' असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समारोपानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारच्या कामाचा आढावा घेतला आणि विरोधकांवर



टीकास्त्र सोडले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''आम्ही महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताचे निर्णय घेतले. माथाडी सुधारणा विधेयक आणले, शेतकरी आणि कामगारांसंदर्भात महत्त्वाच्या चर्चा केल्या. जिथे सहा तास काम अपेक्षित असते, तिथे आम्ही रोज नऊ तास सभागृह चालवले. मोठे बहुमत असूनही आम्ही कोणतीही चर्चा टाळली नाही. आमचे सरकार हे केवळ घोषणाबाजी करणारे नव्हे, तर काम करणारे आहे.''

या पत्रकार परिषदेला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. मात्र, अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गैरहजर होते.

अधिवेशनातील प्रमुख निर्णय आणि कायदे

- १२ महत्त्वाचे कायदे मंजूर झाले.
- माथाडी कामगार कायद्यात सुधारणा – बनावट माथाडी कामगार ओळखण्यास मदत होणार.
- विनियोजन विधेयक मंजूर – सरकारच्या खर्चासंदर्भात महत्त्वाचा निर्णय.
- सर्व प्रश्नांना मंत्र्यांनी उत्तर दिली – फक्त एका दिवशी मंत्र्यांना सभागृहात पोहोचण्यास उशीर झाला, त्यामुळे २० मिनिटांचा वेळ वाया गेला.

>> पान २

### भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी देवेंद्र फडणवीसांचे विश्वासू रवींद्र चव्हाण



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर भाजपला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाला असून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. वरळीमध्ये झालेल्या जय्यत कार्यक्रमामध्ये रवींद्र चव्हाणांचे नाव >> पान २

# बस मधून रस्त्यावरच उतरवल्याने संतप्त विद्यार्थ्यांचा रास्तारोको आंदोलन, बराच वेळ वाहतुकीचा खोळंबा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जळगाव जामोद ते नांदुरा या मार्गावर विद्यार्थ्यांना रस्त्यावरच एसटी बसमधून उतरविल्याने संतप्त झालेल्या गावकरी आणि विद्यार्थ्यांनी मार्गावरील एसटी बस अडवून रास्ता रोको आंदोलन केले. अचानक सुरू झालेल्या या आंदोलनामुळे प्रशासनामध्ये एकच खळबळ उडाली. तसेच बस रोखून धरल्याने बसमधील प्रवाशांना देखील ताटकळत बसावे लागले आहे. आगार प्रमुखांनी बस पूर्वीप्रमाणे नेण्यात येईल,

**आगार प्रमुखाच्या आश्वासनाने आंदोलन स्थगित**

असै आश्वासन दिल्याने सदर आंदोलन स्थगित करण्यात आले.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद ते नांदुरा रोड वरील येरळी येथील जुन्या पुलावरून एसटी महामंडळच्या बस न जाता नवीन पुलावरून जात आहेत. त्यामुळे मानेगाव व येरळी मधील विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. शाळा, महाविद्यालयातून येणारे विद्यार्थी बसमधून येत असल्याने विद्यार्थ्यांना रात्री उशीरा रस्त्यावर उतरवले जाते.



यामुळे रात्रीच्या अंधारातच विद्यार्थ्यांना गावापर्यंत जावे लागते.यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचा धोका निर्माण झालेला आहे. मागील काही दिवसांपासून बस चालक- वाहकांकडून होत असलेल्या या प्रकारामुळे ग्रामस्थ संतप्त झाले होते. परिणामी, मानेगाव व येरळी येथील नागरिकांनी मार्गावरून जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या सर्व बसेस रोखून धरल्या होत्या. बस चालक व वाहकांच्या मनमानी कारभाराबाबत रोष व्यक्त करत बस पूर्वीप्रमाणे नेण्याची मागणी करण्यात आली.दरम्यान घटनेची माहिती पोलीस प्रशासन व आगार व्यवस्थापकाला मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून गावकरी व विद्यार्थ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. यावर चर्चा करत सर्व बसेस विद्यार्थ्यांच्या व गावकऱ्यांच्या मागणीनुसार गावातून पाठवल्या जाईल; असे आश्वासन आगार व्यवस्थापकांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

CMYK

## वर्षा सहलीचा आनंद लुटा पण

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता. दोन वर्षापूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली. पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत. खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मर्यादेच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

# आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ठाणेदारावर शिस्तभंगाची कारवाई करा

## सीआरपीएफ कमांडो गौतम धनवे यांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**दिग्रस** : दिग्रस पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार सेवानंद वानखेडे यांनी जीडीपी यांच्या आदेशाचे उल्लंघन करून स्वत:च्या बदलीनंतर दिग्रस पोलीस ठाण्यात निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करून खासगी वाहनाद्वारे पोलीस गणवेशात स्वत:ची मिरवणूक काढून व इतर ऑनड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याकडून प्रसिद्धीसाठी स्वत:च्या अंगावर फुलांचा वर्षाव करून जीडीपी यांच्या आदेशाचे उल्लंघटन केले आहे. त्यामुळे ठाणेदारावर शिस्तभंगाची, निलंबनाची तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी एसआरपीएफ कमांडो गौतम धनवे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमुद केले आहे की,यवतमाळ पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांची बदली दिग्रस येथून पुसद शहरात करण्यात आली आहे. परंतु, १४ जून रोजी दिग्रस येथून बदली जातांनी सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी ऑनड्युटीवर दिग्रस पोलीस ठाण्यात गुलदस्ते, हार, सजवलेले गाडी व सर्व सार्वजनिक स्वरुपाचा कार्यक्रम आयोजित करून तत्कालीन ठाणेदारांना निरोप देण्यात आला. याबाबत प्रसिद्धीसाठी फोटोव व्हीडीओ वायरल झालेले आहेत.हा सर्व प्रकार पोलीस महासंचालकांच्या आदेशाचे उल्लंघन करणा आहे. दिग्रस पोलीस ठाण्यात डीजे लावून ऑनड्युटी गणवेशावर गणेश् उत्सव साजरा करण्यात आला आहे. दिग्रस पोलीस स्टेशन हे धाऱ्मिक स्वरुपाचे झालेले आहे. हे भारतीय राज्यघटनेत असंवैधानिक आहे. पोलीस महासंचालकांच्या लेखी आदेशालाही काहीच जुमानले नाही.यामुळे शासकीय वेळ आणि यंत्रणांचा गैरवापर होत आहे.पोलीस ठाण्याची शिस्त बिघडणारे प्रकार होत आहेत.भारतीय राज्यघटनेतील कलमाचे थेट उल्लंघन दर्शविणारे आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांच्यावर विभागीय चौकशी व शिस्तभंगाची कारवाई करावी, व निलंबीत करावे, भविष्यात अशा प्रकारच्या प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला पुन्हा सुचना निर्गमित कराव्या, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधीत पोलीस निरीक्षकांवर कारवाई करावी, अशी मागणी सीआरपीएफ कमांडो गौतम विठ्ठल धवने यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.






सीआरपीएफ कमांडो गौतम धनवे

### एसडीपीओ कडील ठाणेदाराच्या तक्रारीचा तपास काढून अपर पोलीस अधीक्षक पीयूष जगताप कडे देण्यात यावा

दिग्रस पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार सेवानंद वानखेडे दिग्रस तालुक्यात रूजू झाल्यापासून वादग्रस्त ठरलेले आहे. त्यांच्या बद्दल अनेक नागरीकाने वरिष्ठांकडे तक्रारी केल्या आहेत. मध्यंतरात त्यांनी कायद्याच्या आदेशाला पण केराची टोपली दाखवली आहे. ऑनड्यूटीवर शेतामध्ये खाजगी पार्टीत सामील होऊन गणवेशात गाने म्हणणे. पोलीस स्टेशन हे खाजगी मालकी समजून डी जे लावून धार्मिक कार्यक्रम आयोजित करून त्याबाबत प्रचार करने. पोलीस महासंचालक यांचा लेखी आदेश असून त्याच्या आदेशाला पायमल्ली करून स्वताच्या प्रसिद्धीसाठी पोलीस स्टेशन दिग्रस मध्ये निरोप समारंभ आयोजित करून स्वतःवर पोलीस कर्मचाऱ्यांकडून फुलाचा वर्षाव करून खाजगी गाडीमध्ये मिरवणूक काढून प्रसिद्धी साठी विडिओ वायरल करने, तथा राजकीय कार्यक्रम असून त्या कार्यक्रमात ऑनड्यूटीवर गणवेशात फूलाचा मोठा गुच्छ घेऊन खासदाराच्या वाढदिवसानिमित्त हजेरी लावून महाराष्ट्र शासन परिपत्रकाचे उल्लंघन तथा बॉम्बे पोलीस अक्ट १९५१ च्या नियमावली चे उल्लंघन केल्याबद्दल ठाणेदार वर शिस्तभंगाची कारवाई कारवाई करावी, कारवाई न झाल्यास नागपूर उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार आहे. तसेच सदर प्रकरणाचा तपास अपर पोलीस अधीक्षक पियूष जगताप यांच्याकडून करावा.अशी मागणी होण्याबाबत गौतम धवने यांनी केली आहे.

## रिसोड तालुका ग्राहक पंचायत ची नूतन कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी प्रभाकर पाटील



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : अखिल भारतीय ग्राहक पंचायत ची २०२५ – २८ ची नूतन कार्यकारणी वाशिम येथील जिल्हा कार्यकारणी च्या बैठकीमध्ये जाहीर करण्यात आली वाशिम जिल्हा ग्राहक पंचायत ची कार्यकारणी बैठक प्रांत अध्यक्ष डॉ. नारायण मेहरे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारणी बरोबर रिसोड तालुका ग्राहक पंचायत २०२५ – २८ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यामध्ये अध्यक्ष प्रभाकर पाटील उपाध्यक्ष अरुण लोथे, प्रा.संजीव गायकवाड, तर सचिव पदी प्रा. विजय देशमुख, सहसचिव सचिन गांजरे, कार्यालय मंत्री सतीश मांदळे, कोषाध्यक्ष बबन सुरशे, तालुका महिला प्रमुख शितल पांडे, सहप्रमुख सौ कल्पना बानोरे ,प्रचार प्रसिद्धीप्रमुख शितल पाटील धांडे ,पर्यावरण आयाम प्रमुख संजय दादा उकळकर ,आयटी सेल प्रमुख संजाबराव देशमुख, यांची निवड करण्यात आली कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर जिरवणकर,भारत कोकाटे, प्रा. सुरेश जुनघरे, प्रसाद गांजरे, बालासाहेब देशमुख,डॉ. रामचंद्र गट्टानी, वैजनाथ खोडके, प्रा. प्रतापराव नायक यांचा समावेश आहे मुख्य मार्गदर्शक म्हणून कमल किशोर बगडिया, प्रा. कमलाकर टेंमधरे यावेळी प्रांत संघटक अभय खेडकर प्रांत सचिव चारुदत्त चौधरी प्रांत महिला आघाडी प्रमुख सौ.शोभाताई गायकवाड वाशिम जिल्हा अध्यक्ष जूगलकिशोर कोठारी ,ग्राहक संरक्षण परिषद सदस्य संतोष वाघमारे ,जिल्हा कोषाध्यक्ष जयंत वसमतकर जिल्हा कार्यकारी सदस्य गजानन बानोरे हे उपस्थित होते.

## 'मना'चे श्लोक चित्रपटातील पोस्टर प्रदर्शित, रूपेरी पडद्यावर हृदयस्पर्शी कथा येईल लवकरच समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** एक हृदयस्पर्शी गोष्ट लवकरच रूपेरी पडद्यावर येत आहे ती म्हणजे 'मना'चे श्लोक. त्या अनुषंगानं काही दिवसांपासून मृण्मयी देशपांडे सहा पुरुष कलाकारांबरोबर दिसणार असल्याच्या बातम्या सोशल मीडियावर झळकत होत्या. अखेर या चर्चेला पूर्णविराम मिळत, चित्रपटाचे लक्षवेधी पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. या पोस्टरमधून 'मना' आणि 'श्लोक' यांच्यातील नात्याचा अंश झळकतो. चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांतली भावना हे त्यांच्या संवादांपेक्षा जास्त काही सांगून जातात. या दोघांच्या नात्याचं गूढ काय आहे? ते प्रेमात आहेत की एखाद्या निर्णयाच्या उंबरठ्यावर? लग्न, नातेसंबंध आणि आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनांमध्ये कोणते मतभेद आहेत हे गौडबंगाल 'मना'चे श्लोकमधून उलगडणार आहे.

या चित्रपटात मृण्मयीबरोबर राहुल देशपांडे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब यांचा सहभाग आहे. या चित्रपटाची संकल्पना आणि दिग्दर्शन स्वतः मृण्मयी देशपांडे यांनी केली आहे. त्या सांगतात, ''मना'चे श्लोक' ही फक्त दोन पात्रांची गोष्ट नाही, तर ती आपल्या सगळ्यांच्या मनातल्या विचारांची झलक आहे. नाती, संभ्रम, मतं हे सगळं आपल्याला आतून स्पर्शून जातं. ही कहाणी बघताना प्रेक्षकांना आपलं काहीतरी आठवेल, आणि त्यांच्या चेहऱ्यावर नकळत हसू येईल.''

'मना'चे श्लोक चित्रपटाबद्दल निर्माते संजय दावरा सांगतात, ''मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करताना 'मना'चे श्लोक'सारखा विचारपूर्ण चित्रपट करणे ही माझ्यासाठी एक खास बाब आहे.'' सह-निर्माते श्रेयश जाधव यांचं म्हणणं आहे, ''ही कथा प्रेक्षकांना नव्या पद्धतीनं भिडेल. मृण्मयीनं ज्या बारकाव्यांसह कथानक मांडलं आहे, त्यामधून प्रत्येकाला स्वतःचं प्रतिबिंब दिसेल.'' गणराज स्टुडिओ आणि संजय दावरा एक्सपरिअन्स प्रस्तुत, नितीन वैद्य प्रॉडक्शन्स सादर करत असलेला 'मना'चे श्लोक हा चित्रपट १ ऑगस्टपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता अनेकजण या चित्रपटाच्या रिलीजची वाट पाहात आहे. या चित्रपटामध्ये प्रेक्षकांना काहीतरी नवीन पाहायला मिळणार आहे.

### ईडीच्या छापेमारीत जप्त केलेल्या सिनेमाच्या स्क्रिप्ट परत मागत संजय राऊतांचा विशेष कोर्टात अर्ज

**मुंबई/प्रतिनिधी :** संजय राऊत यांनी लिहिलेल्या स्क्रिप्ट ईडीकडे परत मागत मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टात अर्ज सादर केला आहे. 'ठाकरे २' नंतर जॉर्ज फर्नांडिस यांच्या जीवनावर आधारित सिनेमा काढण्याची संजय राऊत यांनी तयारी केली होती. मात्र कथित पत्राचाळ घोटाळाप्रकरणी ईडीनं केलेल्या छापेमारीत राऊतांच्या घरातून अनेक कागदपत्र जमा करीत ताब्यात घेतली होती. त्यात राऊतांनी 'ठाकरे २' ची अर्धवट लिहिलेली स्क्रिप्ट आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्या जीवनावर आधारित स्क्रिप्टही ईडीनं ताब्यात घेतली. तसेच त्या स्क्रिप्टसोबत सिनेमासाठी लागणाऱ्या बजेटचा हिशेब असलेला कागदही होता. तोदेखील ईडीने वेगळ्या संशयाने ताब्यात घेतल्याचा संजय राऊत यांनी आपल्या अर्जात उल्लेख केला आहे. ज्येष्ठ कामगार नेते, पत्रकार आणि संसदपटू जॉर्ज फर्नांडिस यांच्या जीवनावर आधारित सिनेमा बनवण्याची संजय राऊत तयारी करीत होते. त्यासाठी त्यांनी बजेटही तयार केले होते. पण ईडीनं छापेमारीत केवळ त्या आकड्यांवर लक्ष केंद्रित केले आणि हे काहीतरी मोठं घबाड आहे, असे समजून, 'ईडी'नं बजेटच्या कागदांसोबत ती स्क्रिप्टही ताब्यात घेतली.

पान १ वरून...

## राज्यातील होमिओपॅथी

संकल्पना आत्मसात होणे मातृभाषेमध्येच जास्त सोप्यारीत्या शक्य होते असे ही तज्ञांना वाटतंय... तिसरी भाषा शिकताना कोवळ्या विद्यार्थ्यांवर मानसिक ताण पडणार असेल, तर तिसरी भाषा हसतखेळत शिकवण्याचे आणि त्यात ही परीक्षा न घेण्याचे निर्णय ही घेता येऊ शकते, मात्र फक्त त्या कारणामुळे नवीन भाषा शिकवूच नये हे योग्य नसल्याचे तज्ञांना वाटतंय.. नवीन भाषा शिकण्याचे फायदे कोवळ्या वयासह उतार वयात ही मिळतात.. उतार वयात नवीन भाषा शिकल्यामुळे डीमेन्शिया म्हणजेच स्मृतीभ्रंशची गती कमी करता येते किंवा ते टाळता येते... त्यामुळे कोणत्याही वयात नवीन भाषा शिकणे बुद्धीला तल्लख ठेवण्यासाठी आवश्यक असल्याचे मानसोपचार तज्ञांचे म्हणणे आहे.

## विरोधकांच्या डोक्यात

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर मुख्यमंत्रींचे स्पष्टीकरण

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले, ''आम्ही ना नरम आहोत, ना गरम; आम्ही कायद्याने चालणारे आहोत. कायद्याने जे योग्य तेच केले आहे.''

विरोधी पक्षनेते निवडीचा मुद्दा 'अध्यक्षांच्या कोर्टात'

विरोधी पक्षनेता अद्याप निश्चित का झाला नाही, याबाबत विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री म्हणाले, ''हा अधिकार आमचा नाही, तो विधीमंडळ अध्यक्षांचा आहे. अध्यक्ष स्वतंत्र आहेत, ते निर्णय घेतील. त्यांनी उद्या निर्णय घेतला तरी आम्हाला हरकत नाही.''

अधिवेशनात लक्षवेधी सूचना वाढल्या, पण...

अधिवेशनात लक्षवेधी सूचना मोठ्या प्रमाणावर वाढल्या, मात्र यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''यात काही हरकत नाही, पण अध्यक्ष आणि सभापतींना विनंती आहे की निकषात बसणाऱ्या लक्षवेधी सूचना घेतल्या पाहिजेत.'' अधिवेशन संपले असले, तरी सरकारने घेतलेल्या निर्णयांची आणि विरोधकांच्या भूमिकेची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू राहणार आहे.

## भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी

जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही असं मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले.

रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्र्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलं. तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे १२ वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणणे आणि भाजपला एक नंबरचा पक्ष बनवणे हे त्यांच्यासमोरील आव्हान असेल.

कोण आहेत रवींद्र चव्हाण?

– २००२ साली भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी

– २००५ मध्ये काँग्रेस उमेदवाराचा पराभव करत कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक.

– २००७ मध्ये महापालिका स्थायी समितीचे सभापती.

– २००९ पासून, डोंबिवली विधानसभा मतदारसंघाच्या निर्मितीपासून सलग चार वेळा आमदार.

– २०१६ साली फडणवीस सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात स्थान. – २०१६ ते २०१९ या काळात बंदरे, माहिती व तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण तसेच अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या ४ खात्यांच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी.

– रायगड आणि पालघर या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी

– २०२० साली भाजपा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री म्हणून नेमणूक.

– २०२२ साली शिंदे-फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री. दोन खात्यांची जबाबदारी.

– सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी.

– अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री पदाच्या कारकिर्दीत 'आनंदाचा शिधा', 'रेशन आपल्या दारी' सारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले.

– कट्टर सावरकर भक्त, मॉरिशस महाराष्ट्र मंडळाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा स्थापन करण्यास मोलाचे सहकार्य.

– राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पार्टी यांच्या विचारधारेचे संस्कार.

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विश्र्वासू अशी ओळख.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### प्रदूषित पाणी थेट नदी, नाल्यांमध्ये सोडणाऱ्या उद्योगांवर कडक कारवाई करणार; पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्या औद्योगिक घटकांकडून दूषित पाणी थेट नदी, नाल्यांमध्ये सोडले जाईल, अशा उद्योग घटकांवर कडक कारवाई केली जाईल, असे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले

सदस्य भास्कर जाधव यांनी लोटे ( ता. खेड, जि. रत्नागिरी ) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याबाबत प्रश्नक उपस्थित केला होता. या प्रश्नकाच्या चर्चेत सदस्य अबू आझमी, शेखर निकम, सुनील प्रभू, मनीषा चौधरी, योगेश सागर यांनी सहभाग घेतला.

मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, जे उद्योग प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया न करता नदी नाल्यात सोडतात अशा उद्योगांना प्रथम नोटीस दिली जाते. नोटीस दिल्यानंतर त्यांच्यात सुधारणा झाली नसल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जात आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांना लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांच्या केलेल्या स्थळ पाहणीच्यावेळी दोषी आढळलेल्या मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रीज या उद्योगास पर्यावरण संरक्षण कायद १९८६ व घातक घनकचरा अधिनियम अंतर्गत निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या उद्योगाला १८ जून रोजी बंद करण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

उद्योग घटक कितीही मोठा असला तरी प्रदूषणाचे नियम तोडले जात असतील तर कोणाचीही गय केली जाणार नाही. या संदर्भात लवकरच एक बैठक घेतली जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### इन्स्टावर ओळख अनब लग्नाचा हट्ट, वर्ध्यात नर्सवर कटरने वार, हल्ल्याचं कारण समोर

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्धा शहरातील मुख्य बाजारपेठ परिसरात भर रस्त्यावर एका तरुणाने एका नर्सवर जीवघेणा हल्ला केला आहे. आरोपीनं धारदार कटरने नर्सच्या हातावर अनेक ठिकाणी वार केले. या हल्लयात ती गंभीर जखमी झाली. या हल्लयानंतर तरुणाने घटनास्थळावरून पळ काढला आणि थेट पोलीस ठाण्यात सरेंडर केलं. या घटनेने वर्धा शहरात खळबळ उडालीय. आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे.

पीडित नर्स आणि हल्लेखोर तरुण हे एकमेकांच्या ओळखीचे असल्याची माहिती समोर आली आहे. दोघांची काही दिवसांपूर्वी इन्स्टाग्रामवर ओळख झाली होती. याच ओळखीतून तरुणाने नर्सवर एकतर्फी प्रेम करायला सुरुवात केली होती. त्याने तरुणीकडे लग्नाची मागणी घातली. पण तिने लग्नास नकार दिला. तरीही आरोपी तरुणीशी लग्न करण्यासाठी हट्टाला पेटला. याच कारणातून त्याने सोमवारी नर्सवर कटरने वार केले. वर्ध्याच्या मुख्य बाजारपेठ परिसरात असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ नर्सवर हा प्राणघातक हल्ला झाला.

तरुणाने नर्सच्या हातावर कटरने घाव करत गंभीर जखमी केले. हा हल्ला झाल्यानंतर तरुणीने रक्तबंबाळ अवस्थेत बाजुलाच असलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात धाव घेतली. पक्षाच्या कार्यालयात आश्रय घेतल्याने ती थोडक्यात बचावली. अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. हल्ला केल्यानंतर तरुणाने घटनास्थळावरून पळ काढला, पण जमाव पाठीम ागे लागल्याने त्याने रस्त्यावरच असलेल्या रामनगर पोलीस ठाण्यात प्रवेश करत शरणागती पत्करली.

जमावाचा पाठलाग सुरू असताना आरोपी राम नगर पोलीस ठाण्यात शरण गेल्यामुळे तो बचावला. ही घटना वर्धा शहराच्या मध्य भागात असलेल्या रस्त्यावर घडली आहे. २४ वर्षांची ही तरुणी नर्स म्हणून एका खाजगी रुग्णालयात काम करत होती. रुग्णालयाजवळ असलेल्या रस्त्यावर तिला तरुण भेटला.

तरुणीसोबत बोलत असताना अचानक काही वेळानंतर सौरभ रवींद्र क्षीरसागर या २९ वर्षीय तरुणाने त्याच्या हातातले कटर बाहेर काढले आणि तरुणीवर सपासप वार करत तिला गंभीर जखमी केलं. तरुणीवर हल्ला केल्यानंतर सौरभने तिथून पळ काढला. यानंतर आजूबाजूच्या नागरिकांनी त्याचा पाठलाग केल्यामुळे तो रामनगर पोलीस ठाण्यात बचावासाठी गेला आणि शरणागती पत्करली. सौरभ रवींद्र क्षीरसागर हा तरुण भुगावचा राहणारा आहे.

# क्षयरोग प्रसार रोखण्यासाठी बी-पाल्म उपचारांसह विशेष मोहीम

## आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्याचा संकल्प केला असून, त्यानुसार राज्यात क्षयरोग निम ूलनासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांची चाचणी करून, निदान झालेल्या रुग्णांना तत्काळ उपचाराखाली आणण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच, क्षयरोगविरोधी औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या रुग्णांसाठी राज्यात नव्याने बी-पाल्म (इझरड्च्) उपचार पद्धती सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत दिली.

सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या.

सन २०२५ मध्ये २ लाख ३० हजार क्षयरुग्ण नोंदणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, जानेवारी ते मे या कालावधीत राज्यात १७ लाख ३० हजार ८०८ क्षयरुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामधून ९५ हजार ४३६ रुग्णांना क्षयरोग झाल्याचे निदान झाले असून, त्यांची केंद्र शासनाच्या 'निक्षय' प्रणालीवर नोंद करण्यात आली आहे. त्यांच्याकडून इतरांना संसर्ग होऊ नये म्हणून त्यांना तत्काळ उपचाराखाली आणण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या निक्षय पोषण योजनेअंतर्गत उपचारादरम्यान योग्य पोषण मिळावे यासाठी रुग्णांच्या बँक खात्यात दरमहा एक हजार रुपये जमा करण्यात येत आहेत. प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियाना' अंतर्गत प्रत्येक क्षयरुग्णासाठी 'निक्षय मित्र' नेमले जात असून, उपचारादरम्यान किमान सहा महिन्यांसाठी 'फूड बास्केट' पुरविण्याची कार्यवाही सुरू आहे. क्षयरोग दूर करण्यासाठी ही मोहीम लोकचळवळ व्हावी यासाठी सर्वसामान्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सभागृहात केले.

या लक्षवेधी सूचनेत सदस्य बाबासाहेब देशमुख, समीर कुणावर, मनीषा चौधरी आणि विक्रम पाचपुते यांनीही सहभाग घेतला होता.

# खेळण्यातील बंदुकीने सोन्याचं दुकान लुटलं, घटनेला धक्कादायक वळण, मालकच निघाला मास्टरमाइंड

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** १५ एप्रिल रोजी सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरात एक धाडसी दरोडा टाकण्यात आला होता. येथील श्री ज्वेलर्स नावाच्या सराफी पेढीवर खेळण्यातील पिस्तुलाचा धाक दाखवून दरोडा टाकण्यात आला होता. यावेळी दरोडेखोरांनी दुकानातील लाखो रुपयांचे दागिने लूटून नेले होते. एका सोन्याच्या दुकानात अशाप्रकारे खेळण्यातील बंदुकीच्या माध्यमातून दरोडा पडल्याने सर्वत्र खळबळ उडाली होती.



पण या प्रकरणात आता धक्कादायक वळण लागलं आहे. श्री ज्वेलर्सवर दरोडा टाकणारा दरोडेखोर दुसरा तिसरा कुणी नाही, तर दुकानाचा मालकच असल्याचं समोर आलं आहे. मालकानेच आपल्या चुलत भावाच्या मदतीने हा दरोडा घडवून आणला होता. पोलिसांनी खोलात जाऊन याचा तपास केला असता या दरोड्याचा म ास्टरमाइंड सराफी पेढीचा मालक विष्णू दहिवाल असल्याचं समोर आलं आहे.

ज्यावेळी ही दरोड्याची घटना घडली. तेव्हा पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने दोन जणांना अटक केली होती. संबंधित दोघांची चौकशी केली असता सराफी पेढीचा मालक विष्णू दहिवाल याचं नाव समोर आलं. दहिवाल याने कर्जबाजारी झाल्याने देणेकऱ्यांचा ससेमिरा चुकवण्यासाठी आपल्या चुलतभावाच्या मदतीने सराफी पेढीवर दरोडा टाकण्याचा प्लॅन आखला होता, अशी माहिती समोर आली आहे. याप्रकरणी चुलतभावाला अटक करण्यात आली होती.

मात्र या सराफ पेढीत भीसीच्या माध्यमातून अनेक नागरिकांची फसवणूक केल्याचा देखील प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी धायरी परिसरातील 'श्री ज्वेलर्स' या सोन्याच्या दुकान मालकासह त्याच्या पत्नी विरोधात फसवणूक, महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे रक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता फसवूक झालेले पीडित नागरिक विष्णू दहिवालला अटक करण्यासाठी आक्रोश करत आहेत. यामध्ये बहुतांशी हातावर पोट असणाऱ्या महिला आहेत.

# रेड झोनमधील उद्योगांनी प्रदूषणाचे नियम न पाळल्यास कारवाई- पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रेड झोनमध्ये असलेल्या उद्योगांना स्वतंत्र धोरणानुसार परवानग्या दिल्या जात असून त्यांची कार्यपद्धत, जबाबदाऱ्या आणि उपाययोजना वेगळ्या असतात. मात्र, त्यांनाही प्रदूषण नियंत्रणाचे निकष लागूच असतात. त्यामुळे रेड झोनमधील उद्योगांकडूनही नियमभंग झाल्यास कारवाई केली जात असल्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासा वेळी सांगितले. सदस्य अतुल भातखळकर यांनी या संदर्भातील प्रश्नक उपस्थित केला होता. या प्रश्नकाच्या चर्चेत सदस्य वरुण सरदेसाई, मनीषा चौधरी आणि जितेंद्र आव्हाड यांनी सहभाग घेतला.

मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, प्रदूषण नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत व्यापक प्रमाणात कारवाई केली जात आहे. प्रदूषणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांना नोटीस बजावण्यात येत असून राज्यात ३३१ उद्योगांना नोटीस देण्यात आल्या आहेत तर ३०४ उद्योगांना अंतरिम आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रदूषणाचे नियम न पाळणाऱ्या ३१८ उत्पादकांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनानाही योग्य प्रकारे कचरा व्यवस्थापन, सांडपाणी निचरा याबाबत कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. प्रदूषण संदर्भात नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या जात आहेत. आशा प्राप्त तक्रारी संबधित अधिकाऱ्यांना पाठवून याबाबत कारवाई केली जात आहे. तसेच उद्योगांकडून होणाऱ्या सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होत आहे की नाही, यावर लक्ष केंद्रित केले असून याबाबतही संबंधित उद्योगांना आदेश देण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम. एन. गायकवाड यांनी वसंतराव फुलसिंग नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी व राजनितीज्ञ होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ विराजमान होते. वसंतराव नाईक हरितक्रांती , पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात.इ.स. १९७२ मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही क्रांतीकारी कार्य नाईकांनी केले.असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सिद्धार्थ इंगोले यांनी केले. आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.प्रकाश हनवते यांचे सहकार्य लाभले.याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# वृक्ष संवर्धन हि काळाची गरज : बाबाराव पाटील खडसे

दैनिक आपला विदर्भ




**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक पेड मा के नाम. उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबाराव पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी बोलताना बाबाराव पाटील यांनी निसर्गाचा समतोल राखण्यात वृक्ष अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतात.मोठ्या प्रकारामध्ये जंगलतोड,वृक्षांची कत्तल केली जात आहे त्यामुळे वृक्षारोपण करणे काळाची गरज असून वृक्षसंवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.मातृभूमीवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक तरी वृक्ष लावून त्याची देखभाल करावी. हा मोलाचा संदेश दिला. प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी या प्रसंगी मत व्यक्त करताना जागतिक तापमान वाढीमुळे वातावरणात कमालीचा बदल झाला असून जंगलतोड वाढल्यामुळे वन्यजीव,पशुपक्षी तसेच मानवी जीवनाला धोका निर्माण झाला असून वाईट परिणाम होताना दिसत आहेत पर्यावरण अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करावे असे मत व्यक्त केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. केशव कोकाटे यांनी वृक्षांचे मानवी जीवनामध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान असल्याचे विचार व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक- स्वयंसेविकांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. कार्यक्रमासाठी डॉ.प्रवीण हाडे,डॉ.अमोल आढाव यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी स्वयंसेवक-सेविका उपस्थित होते.

# भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रिय ओबीसी मोर्चा द्वारे विविध मांगण्यासाठी ढानकी येथे निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/तालुका प्रतिनिधी :** भारत मुक्ती मोर्चा तथा राष्ट्रीय ओबीसी मोर्चा ह्या राष्ट्रव्यापी संघटनाद्वारे वामन मेश्राम साहेब तथा चौधरी विकास पटेल यांच्या नेतृत्वात आज १ जुलै २०२५ रोजी ३१ राज्य ६५० जिल्ह्यांमध्ये भारत बंद चे आयोजन करण्यात आले होते.

ओबीसी जनगणनेच्या समर्थनात आम्ही उतरलो मैदानात, वक्फ संशोधन विधेयक रद्द झालेच पाहिजे,भारतीय संविधानाचा विजय असो. ह्या नाऱ्यांसह भारत बंद अंतर्गत आज ढानकी येथे भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय ओबिसी वर्ग मोर्चा या संघटनाद्वारे महामहीम राष्ट्रपती यांना ठाणेदार ढानकी पोलिस स्टेशन यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. यामध्ये मशीन बंद करून बॅलेट पेपर वर निवडणुका घ्याव्यात. ओबीसिंसह सर्व जातींची जातिनिहाय जनगणना व्हावी.आरएसएस बिजेपि च्या केंद्र सरकार मधील अनेक पदाधिकाऱ्यांद्वारे वारंवार मूलनिवासी बहुजन महापुरुषांचा अपमान या विरोधात कार्यवाही व्हावी. वक्फ संशोधन विधेयक २०२५ संविधान विरोधी असून ते रद्द करावे.आदिवासींची पाचवी सहावी अनुसूची लागू करावी,तसेच ढानकी येथील तेंभेश्वर नगर येथे वास्तव्यास असलेल्या नागरिकांना त्यांच्या निवासी जमिनीची मालकी देण्यात यावी.यांसह विविध मागण्या या निवेदनात करण्यात आलेल्या आहेत.

ह्या आंदोलनाचे नेतृत्व अमोल पाटील,कुलदीप देवसरकर यांनी केले. यावेळी मार्गदर्शक भारतीय युवा मोर्चा चे राष्ट्रिय महासचिव विद्वान केवटे,भारत मुक्ती मोर्चा चे अनिल लहाने, लहुजी क्रांती मोर्चा चे विनोद बनसोडे,संजय बनसोडे, दिलीप कलाले,बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क चे मिलिंद चिकाटे,मल्हारी दवणे,छत्रपती क्रांती सेनेचे कृष्णा पाटील चंद्रवंशी,दिगंबर कदम, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेचे आशुतोष तारमेकवाड,राष्ट्रीय मुस्लीम मोर्चा चे शेख जब्बार भाई,सलीम भाई,अतिक भाई,मुनव्वर खान पठाण, भाई,रफिक भाई,सलमान भाई,शाहरुख पठाण,शेख माजीद,राष्ट्रीय गोर बंजारा क्रांति संघाचे तिलक राठोड,भारतीय युवा मोर्चा चे राहुल गायकवाड,ओबीसी मोर्चाचे सुनील भोने,जयशील कांबळे,यांसह समजिकसंघटनांचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# जिल्ह्यातील अतिवृष्टीची मदत तात्काळ देण्यासाठी माजी कृषिमंत्री शरद पवारांना साकडे

## जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली शरद पवार यांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** गत आठ दिवसापूर्वी मेहकर लोणार सिंदखेड राजा या तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीस मिळाली आहे. पेरणी केलेल्या बी बियाणे बरोबरच जमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांवर मोठ्या आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे शासनाने या नुकसानीचा भरपाई म्हणून तात्काळ मदत करावी, त्याचबरोबर खरडून गेलेल्या जमिनीमध्ये माती टाकण्यासाठी आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय माजी कृषीमंत्री शरद पवार



यांची भेट घेऊन त्यांना जिल्ह्यातील झालेल्या नुकसानीची माहिती दिली व नुकसान भरपाई तात्काळ मिळवून देण्याची मागणी केली. मेहकर तालुक्यामध्ये २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने पाणीच पाणी झाले आहे. शेतकरी खरडून गेली आहे शेतातील गाळही वाहून गेले जमिनी तब्बल पाच वर्षापर्यंत पेरण्यायोग्य होणार नसल्याचेही शेतकऱ्यांची प्रचंड हानी झाली आहे काही शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर खते बियाणे व शेतीकडून गेल्याने त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट आले आहे तर काही भागात संपूर्ण जमीनच खरडून गेल्याने सदर जमिनी ह्या वर्षीच नव्हे तर पुढील पाच वर्षेही पेरणी योग्य नसल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी त्याचबरोबर शेतात माती टाकण्यासाठी सुद्धा आर्थिक मदत करावी यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सचिव पंकज पळसकर, बुलढाणा राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाप्रमुख गोपाल आखाडे, डोणगाव शहराध्यक्ष विजय सरकटे, गणेश आढाव, तालुका संपर्कप्रमुख बाळराजे ठाकरे यांनी माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांची आज वाय.बी.चव्हाण सेंटर मुंबई या ठिकाणी भेट घेऊन,बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील व इतरत्र खेडे विभागांमध्ये महापुराने थैमानाबाबत माहिती देण्यात आली.यावेळी माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे चर्चा करून भरीव मदत लवकरात लवकर देण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच पंकज पळसकर यांना मेहकर तालुक्यातील किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या संदर्भात संपूर्ण माहिती द्या तात्काळ शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्याला पत्र लिहून नुकसान भरपाई साठीअशी आश्वासन दिले.

## विविध वृत्त...

### भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** इव्हिएम हटाव व बॅलेट पेपर लागु करण्यात यावा, ओबीसी जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे,वक्फ बोर्ड संशोधन अधिनियम रद्द करण्यात यावे, आदिवासी समाजाच्या हितासाठी असलेल्या ५वी व ६वी अनुसूची लागु करण्यात यावी, महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात आले पाहिजे व १९४९चा टेंपल ॲक्ट रद्द करण्यात आला पाहिजे.. तसेच शेतकऱ्यांच्या पिकाला हमी भाव व भाव फरक मिळाला पाहिजे व इतर मागण्यांसाठी आज भारत बंदचे आयोजन राष्ट्रीय अध्यक्ष मा .वामन मेश्राम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली संपूर्ण भारतभर आंदोलन करण्यात आले त्याचाच भाग म्हणून डोणगांव येथे भारत मुक्ती मोर्चा, संभाजी ब्रिगेड, राष्ट्रीय आदिवासी एकता परीषद, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, महाराष्ट्र गरीब ग्रेड संघटना, राष्ट्रीय किसान मोर्चा,बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कच्या वतीने आंदोलन करण्यात आले यावेळी भागवत जाधव, पांडुरंग पाटील,मौ. आजीमभाई, एल.आर.खोडके, हरिदास मिरासे, विठ्ठल वाघमारे, हुसैन शहा, जावेद खान ठेकेदार, अफरोज शहा, अहेमद बागवान,जावेद शहा,दत्ता बोरकर, शिवाजी डाखोरे,भागवत डाखोरे सह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते

### सेवानिवृत्ती बद्दल १५ पोलीस अधिकारी व अंमलदारांना निरोप; पोलीस अधीक्षक तांबे यांनी भेटवस्तू देऊन केला सपत्निक सत्कार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नियत वयोमानाने जिल्हा पोलीस दलातून १५ पोलीस अधिकारी व अंमलदार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी प्रमाणपत्र, भेटवस्तू देत कुटुंबीयासोबत सत्कार करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे ३० जून रोजी सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळीजिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह अपर पोलिस अधीक्षक बी.बी. महामूनी यांच्या हस्ते सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांचा, अंमलदारांचा सेवानिवृत्त प्रमाणपत्र, झाडांचे रोपटे व भेटवस्तू तसेच साडी देऊन निरोप देण्यात आला. बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील पोलीस उप पोलीस निरीक्षक विश्वनाथ रामसिंग राठोड, पोलीस उपनिरीक्षक गुलाबराव केशवराव काळे, पोहेकॉ प्रविण कान्होबा बोर्डे, सफौ रमेश विठोबा बाजड, पोलीस उपनिरीक्षक राजु जगदेव आगासे, सफौ रविंद्र काशीराम वानखडे, पोलीस उपनिरीक्षक विलास श्रीपत कड, पोहेकॉ दत्तात्रय बाजीराव लोंढे, सफौ विजयसिंह रामकृष्णा महाले, पोहेकॉ रामप्रसाद पांडुरंग चतुर, सफौ नागोराव बा. पवार, सफौ अरुण बा इंगोले, सफौ गणेश मोतीराम पवार, पोकॉ भगवान लक्ष्मण नागरे, पोहेकॉ सुनिल मानिकराव दळवी या १५ पोलीस अधिकारी व अंमलदार सेवा निवृत्त झाले असून त्यांना निरोप देण्यात आला आहे. यावेळी पोलीस अधीक्षक तांबे यांनी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सपत्निक सत्कार करून त्यांना भेटवस्तू दिल्या. त्याच बरोबर त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# कृषी दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात वृक्षारोपण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** १ जुलै हा दिवस माजी मुख्यमंत्री आणि जागतिक कीर्तीचे कृषीतज्ञ वसंतराव नाईक यांच्या जन्मदिवशी महाराष्ट्र कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.कृषी दिनाच्या औचित्य साधून येथील पोलीस अधीक्षक कार्यालय पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी अधिकारी व अंमलदार यांची उपस्थिती. हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जन्मदिवस हा महाराष्ट्र राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.





वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रा हरितक्रांती करून शेतकऱ्यांना समृद्ध करण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्याचे स्मरण व्हावे, यासाठी राज्यात १९८९ पासून वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घेतला. वसंतराव नाईक हे १९६३ ते १९७५ या कालावधीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवले. त्यांनी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आणि कृषी विद्यापीठांची स्थापना करून राज्याला शेतीत अग्रेसर बनवले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र देशातील प्रमुख कृषी उत्पादक राज्यांपैकी एक बनले आहे. म्हणूनच त्यांचा जन्मदिन,१ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा होतो. कृषी दिनाच्या औचित्य साधून येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी पोलीस विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## शेतकऱ्याने गळफास घेऊन केली आत्महत्या दिग्रस तालुक्यातीलफुलवाडी येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :**तालुक्यातील फुलवाडी येथील एका शेतकऱ्याने शेती करण्यासाठी पैसा अडका नसल्याकारणाने आपली शेती यावर्षी पडीक राहील व आपल्याला उत्पन्न मिळणार नाही या विवंचनेत राहत्या घरी स्लॅबच्या



मृतक - दिनेश राठोड

हुकाला पांढऱ्या धागा असलेली दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३० जून २०२५ रोजी दुपारी ५.३० वाजताच्या दरम्यान घडली.

दिनेश पांडुरंग राठोड (वय - ३६) वर्ष रा. फुलवाडी असे गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे.

सद्या पावसाचे दिवस असून शेतकऱ्याच्या पेरणी आटोपल्या परंतु आपल्या शेतात अजून कोणतेच काम पैसे अडका नसल्याने पेरणी पासून वंचित राहिल्याने यावर्षी शेतातून कोणतेच पीक घेऊन उत्पन्न घेऊ शकत नसल्याने तो विवंचनेत असल्यानेच त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे नातेवाईकांनी सांगितले. सदर मृतक शेतकऱ्याच्या नावाने अडीच एकर शेती आहे. त्यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे सततची नापिकी, सोसायटी बँकेचे कर्ज व खाजगी कर्ज तसेच यावर्षी शेती पिकापासून वंचित राहणार असल्याने त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचेही नातेवाइकांनी सांगितले.

या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. मृतकाच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, चार विवाहित बहिणी, पत्नी, ३ मुली, १ मुलगा असा परिवार आहे. पत्नी माहेरी गेली होती तर त्याचे आईवडील घराबाहेर बसून होते त्याक्षणी त्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेऊन पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनात रामराव मूजमुले व नरसिंग राठोड करीत आहे.

## भिवंडी 'लॉजिस्टीक हब' निर्मितीसाठी उच्चस्तरीय समिती – उद्योग मंत्री उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडी शहर व परिसरात लॉजिस्टीकच्या अपार संधी आहेत. या परिसरातील लॉजिस्टीक उद्योगाचा विकास करणे आवश्यक आहे. रोजगाराच्या संधी यामधून निर्माण होतील. आशिया खंडातील सर्वात चांगला लॉजीस्टीक हब निर्माण होण्याची क्षमता भिवंडी शहर परिसरात आहे. येथील लॉजिस्टीक हबचा सुनियोजित विकास होण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात येईल, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात सांगितले. सदस्य रईस शेख यांनी याबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. उत्तरात मंत्री श्री. सामंत म्हणाले, भिवंडी परिसरातील पायाभूत सोयी सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास करून या भागातील शक्तीकेंद्र असलेल्या लॉजिस्टीक हबचा विकास करता येईल. तसेच कासिमपुरा, खंडू पाडा ता. भिवंडी, जि. ठाणे येथील उस्मान शेठ इमारतीच्या शौचालयाच्या टाकीत पडून बालकाचा झालेल्या मृत्यू प्रकरणाचीसुद्धा उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात येईल. याबाबत चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल.भिवंडी शहर परिसरातील लॉजिस्टीक हबच्या विकासासाठी समितीने सूचीत केलेल्या शिफारशीनुसार धोरण ठरविण्यात येईल. या भागातील लोकप्रतिनिधींनी यासाठी पुढाकार घेऊन लॉजिस्टीक हबच्या निर्मितीत सहकार्य करावे, असेही मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

# हिंदी भाषेच्या सक्ती वरुन भाजप- सेनेत जुंपली

## भाजपच्या चित्रा वाघ व शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांच्यात जुगलबंदी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यात हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून राजकारण तापलेलं असतानाच ठाकरे बंधुंनी पुकारलेल्या एल्गार समोर सरकारला अखेर आपली भूमिका बदलावी लागलेली आहे. पहिलीपासून हिंदी सक्तीचा जीआर सरकारने रद्द केलेला आहे. त्यानंतर आता भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी ठाकरेंवर कविता केली आहे. या कवितेतून त्यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधत टीका केली आहे. आता त्यांच्या या टीकेवर उद्धव ठाकरेंच्या सेनेकडून शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी जशास तसे उत्तर देत चित्रा वाघ यांच्यावर टीका केली आहे. भाजपच्या चित्रा वाघ यांनी





विरोधाला विरोध म्हणजे उभाठा अर्थ शून्य बडबड नुसताच बोभाटा... अशी कविता करून शिवसेनेवर टीका केली. विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी राज्य शासनाने शाळेत पहिल्या वर्गापासून हिंदी भाषेत सक्तीचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला संपूर्ण महाराष्ट्रातून विरोध झाला. विशेष म्हणजे हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे प्रमुख राज ठाकरे या बंधूंनी शासनाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत एल्गार पुकारला होता.त्यामुळे शासनाला आपला निर्णय रद्द करावा लागला. त्यानंतर भाजपच्या चित्रा वाघ यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर कविता करून टीका केली.या टीकेला शिवसेना उबाठा बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांनी जशास तसे सडेतोड उत्तर देत कवितेतून त्यांचा समाचार घेतला. त्या म्हणाल्या की, भ्रष्टाचाराच्या मागे लागताच झळा... विचित्र म्हणे भाजपकडे वळा... चौकशीच्या फ ेऱ्यात जेव्हा अडकल्या ताई ...दिल्लीच्या हुजरेगिरी ची त्यांना घाई ....असे म्हणून त्यांनी शिवसेनेवर केलेल्या टिकीचे जशास तसे उत्तर देत चित्रा वाघ यांच्यावर टीका करत त्यांचा खरपूस समाचार घेतला. भाजपच्या चित्रा वाघ व शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांच्यात झालेली कविता रुपी जुगलबंदी सध्या राजकारणात चर्चेचा विषय झाला आहे. त्यांच्या कविता समाज माध्यमावर चांगल्याच व्हायरल झाल्या आहेत.

# रेशनचे धान्य विकल्यास शिधापत्रिका होणार रद्द

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत विनामूल्य मिळणारे तांदूळ व गहू आदी धान्य अवैधरित्या विकल्याचे आढळल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात येईल, असा इशारा मेहकरचे तहसीलदार निलेश भडके तसेच निरीक्षण अधिकारी नाहुषकुमार बोरोडे यांनी दिला आहे. त्यामुळे यापुढे रेशनचे धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून अवैद्य धान्य विकत घेणाऱ्यांवर लगाम लागणार आहे.

मेहकर तालुक्यातील गरजूंना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत विनामुल्य धान्याचे वितरण येते. या योजनेची अंमलबजावणीं करण्याची जबाबदारी पुरवठा विभागाची असून विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानदारांच्या माध्यमातून तालुक्यातील प्राधान्य व अंत्योदय योजनेतील हजारो रेशन कार्डधारकांना मोफत धान्याचे वाटप करण्यात येते. सदर धान्य वाटप योग्य पद्धतीने करण्यासाठी पुरवठा विभागामार्फत इ पॉश मशीनद्वारे धान्य वाटप करण्यात येते, शासकीय धान्याची अवैध खरेदीविक्री नियमबाह्य आहे. तसे आढळून आल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, त्यामुळे कुणीही शिधापत्रिकाधारक व्यावसायिकांकडे विक्री करताना आढळून आल्यास त्यांचे लाभार्थी यादीतून नाव वगळण्यात येईल, तसेच शिधापत्रिका रद करण्यात येईल. त्याचप्रमाणे, शासकीय धान्याची अवैध साठवणूक करणाऱ्या व्यावसायिकांचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा मेहकरचे तहसीलदार निलेश मडके तसेच निरीक्षण अधिकारी बोरोडे यांनी दिला आहे.

ई पॉश मशीनद्वारे मशीनवर लाभार्थ्यांचा अंगठ्याचा ठसा घेतल्याशिवाय धान्य वाटप होत नसल्याने धान्याच्या काळाबाजारावर आळा बसला आहे. त्या सोबत धान्य वाटपात पारदर्शकता सुद्धा आली आहे. दरम्यान पावसाचे दिवस बघता शासनाचे



निर्देशानुसार पुरवठा विभागाने लाभाध्यध्यर्थ्यांना तीन महिन्याचे धान्य एकत्रित देण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये तिन्ही महिन्यांचा शिधा पाठविण्यात आला व उर्वरित दुकानदारांना धान्य पाठविणे सुरु आहे. आत्ता पर्यंत शिधापत्रिकाधारकांना वाटप १ जूनपासून सुरूही करण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत जिल्ह्यातील ८० टक्क्यांवर लाभार्थ्यांना धान्य वाटप करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली द्वारे रास्तभाव दुकानातून शिधापत्रिकाधारकांना धान्य विनामूल्य दिले जाते. पावसाळ्यात निर्माण होनारी परिस्थिती लक्षात घेऊन जून, जुलै ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांचे धान्या एकाचवेळी वितरण होत आहे. शिधापत्रिकाधारकां कडून मिळणारे धान्य अवैधरित्या खरेदी करून तसेच धान्य साठा व वाहतूक होत असल्याचे व तक्रारी होत आहेत तसे आढळून आल्यास फौजदारी कार्यवाही करण्यात येऊन शिधापत्रिका धारकांच्या शिधा पत्रिका रद्ध करण्यात येईल. त्यामुळे तालुक्यातील शिधापत्रिका धारकांना आवाहन करण्यात येते कि, आपले हक्काचे धान्य विक्री करण्यात येऊ नये असे आवाहन तहसीलदार निलेश मडके यांनी केले. तसेच विकत घेणाऱ्या दुकानदारांवर सुध्दा कार्यवाही करण्यात येईल. असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.